महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/७४२/२०२५-२६ दिनांक :-२०/०४/२०२६

# परिपत्रक

**विषय :-भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थांकरिता राबविण्यात येणाऱ्या लष्करातील सैनिक भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण २०२५-२६ करिता प्रवेश रद्द करण्यात येणाऱ्या विद्यार्थांची यादी.**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाज्योती संस्थेमार्फत राबिण्यात येणाऱ्या भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थाकरिता लष्करातील सैनिक भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता पात्र विद्यार्थांची दुसरी प्रतिक्षा यादी दि.०९/०४/२०२६ रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करून निवड झालेल्या विद्यार्थांना संबंधित प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरिता दि.१४/०४/२०२६ रोजी पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. तसेच निवड झालेल्या विद्यार्थांना दि.१४/०४/२०२६ रोजी पर्यंत प्रशिक्षण संस्थेस रुजू न झाल्यास सदर विद्यार्थांची निवड रद्द करण्यात येईल असे देखील कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार संबंधित प्रशिक्षण संस्थेमार्फत दि.१६-१७/०४/२०२६ रोजी महाज्योती कार्यालयास प्राप्त रुजू विद्यार्थांच्या अहवालानुसार निवड झालेल्या विद्यार्थापैकी ज्या विद्यार्थांनी प्रशिक्षण संस्थेत प्रवेश प्रक्रिया पूर्ण केलेली नाही अश्या विद्यार्थांची निवड रद्द करून सदर विद्यार्थांची यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे, सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.

**नोट:- प्रवेश रद्द करण्यात आलेल्या विद्यार्थापैकी ज्या विद्यार्थांचे प्रवेश नियमित करण्यात आलेले आहे अश्या विद्यार्थांची यादी यासह संलग्न करण्यात येत आहे.**

स्वा
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर**